प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

जून 26, 2019

**गोमती नागरीय सहकारी बँक लि. जौनपुर (यु.पी.) ह्यांचेवर आर्थिक दंड लागू**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, गोमती नागरीय सहकारी बँक लि. जौनपुर (यु.पी.) ह्यांचेवर रु.2,00,000/- (रुपये दोन लाख) आर्थिक दंड लागु केला असून, उत्पन्न ओळख, ॲसेट वर्गीकरण, तरतुदीकरण व इतर संबंधित बाबी - युसीबीज्, अप्रतिभूतित अग्रिम राशींवरील कमाल मर्यादेचे उल्लंघन आणि तुमचा ग्राहक जाणा (केवायसी)/अँटी मनी लॉंडरिंग (एएमएल) ह्यावरील आरबीआयने दिलेल्या सूचनांचे/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केल्याबद्दल लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य, बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की, उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/3045**